महाराष्ट्र शासन

# विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६

## मुंबई नगरपालिका सदस्यांची अपात्रता (शंका निरसन) अधिनियम, १९५८

[ दिनांक १६ जून २०१५ पर्यंत सुधारित ]

# BOMBAY ACT No. XLVI OF 1958

## BOMBAY DISQUALIFICATION OF MUNICIPAL COUNCILLORS REMOVAL OF DOUBTS ACT, 1958.

*[As modified upto the 16th June 2015]*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१५

[किंमत : रुपये ९.००]

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६

## मुंबई नगरपालिका सदस्यांची अपात्रता (शंका निरसन) अधिनियम, १९५८.

---

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**

**कलमे**


१. लघु संज्ञा.

२. अर्थ विवरण

३. सहकारी संस्थेचा संचालक किंवा सदस्य अपात्र ठरणार नाही.

४. आनुषंगिक.

अनुसूची.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम वा[१] ४६

## मुंबई नगरपालिका सदस्यांची अपात्रता (शंका निरसन) अधिनियम १९५८

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर मुंबई **राजपत्रात** तारीख १३ मे १९५८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

विवक्षित नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांना व नोकरांना पैका कर्जाऊ देणाऱ्या किंवा त्यांच्याकडून पैसे कर्जाऊ घेणाऱ्या सहकारी संस्थांचे जे, निवडणुकीच्या वेळी किंवा त्यानंतर संचालक किंवा सदस्य होते अशा विवक्षित नगरपालिका सदस्यांची निवडणूक किंवा त्यांनी पद धारण करण्याचे चालू राहणे वैध ठरविण्याबाबत किंवा त्यांनी पद धारण करणे चालू राहण्यासंबंधीच्या वैधतेसंबंधी शंकेचे निरसन करण्याबाबत अधिनियम ;

ज्याअर्थी, विवक्षित नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांना व नोकरांना पैका कर्जाऊ देणाऱ्या किंवा त्यांच्याकडून पैसे कर्जाऊ घेणाऱ्या सहकारी संस्थांचे जे, निवडणुकीच्या वेळी किंवा त्यानंतर संचालक किंवा सदस्य होते अशा विवक्षित नगरपालिका सदस्यांची निवडणूक किंवा त्यांनी पद धारण करण्याचे चालू राहणे वैध ठरविणे किंवा त्यांच्या निवडणुकीच्या किंवा त्यांनी पद धारण करण्याचे चालू राहण्यासंबंधीच्या वैधतेसंबंधी शंकेचे निरसन करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी यावरून पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

लघु संज्ञा, — १. या अधिनियमास मुंबई नगरपालिका सदस्यांची अपात्रता (शंका निरसन) अधिनियम, १९५८ असे म्हणावे.

अर्थ विवरण — २. या अधिनियमाच्या कारणांकरिता नगरपालिका या संज्ञेचा अर्थ, मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, किंवा मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ किंवा या राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल करून घेतल्याप्रमाणे व लागू केल्याप्रमाणेच्या त्या अधिनियमापैकी कोणताही अधिनियम किंवा राज्याच्या कच्छ तदनुसार रचना केलेली नगरपालिका किंवा बरो नगरपालिका असा समजावा.

(१९०१ चा मुंबई ३. १९२५ चा मुंबई १८.)

सहकारी संस्थेचा संचालक किंवा सदस्य अपात्र ठरणार नाही. — ३. शंका निरसनासाठी यावरून असे जाहीर करण्यात येते की सहकारी संस्थेचा संचालक किंवा सदस्य अपात्र ठरणार नाही. नगरपालिकेच्या सहकारी कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा नोकराला जी सहकारी संस्था कर्जाऊ घेते किंवा संचालक जिने अशी रक्कम दिली आहे किंवा जी त्यांच्याकडून पैसे कर्जाऊ घेते किंवा जिने असे पैसे कर्जाऊ घेतले आहेत अशा सहकारी संस्थेचा संचालक किंवा सदस्य म्हणून असलेला जो कोणताही इसम नगरपालिका सदस्याच्या पदावर निवडून येईल किंवा नेमला जाईल किंवा जो नगरपालिकेचा सदस्य असून वर सांगितल्याप्रमाणेंचा असा संचालक किंवा सदस्य होईल त्या इसमाचा, तो निवडून आला आहे किंवा नेमला गेला आहे किंवा त्यानंतर असा संचालक किंवा सदस्य

---

१. उद्देश व करणे यांचे निवेदन यांसाठी पहा. **मुंबई शासन राजपत्र**, १९५८ असाधारण इंग्रजी-भाग पाच, पृ. क्र. ३११ पहा.

झाला आहे याच केवळ कारणामुळे कर्ज देण्याच्या किंवा पैसे कर्जाऊ घेण्याच्या अशा कोणत्याही व्यवहारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भाग किंवा हितसंबंध होता असे समजण्यात येता कामा नये, आणि त्याप्रमाणे अशा कारणामुळे तो नगरपालिकेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास किंवा नगरपालिकेचा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरणार नाही आणि त्यास कधीही अपात्र ठरविण्यात आले होते असे समजता कामा नये.

४. अनुसूचीतील अधिनियमांची तिच्या २ऱ्या आसनांत निर्दिष्ट केलेल्या रीतीने व मर्यादेपर्यंत सुधारणा करण्यात आली पाहिजे व तशी ती नेहमी करण्यात आली होती असे समजले पाहिजे.

## अनुसूची

| अधिनियम<br>(१) | सुधारणा<br>(२) |
|---|---|
| १. मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ (सन १९०१ चा मुंबई अधिनियम ३ रा), आणि मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल करून घेतल्याप्रमाणेचा व लागू केल्याप्रमाणेचा तो अधिनियम. | कलम १५, पोट-कलम (१) यात—<br>(१) कंडिका (ग) मध्ये "ज्याचा" या शब्दापूर्वी "यांत यापुढे तरतूद खेरीज करून हे शद्र दाखल करावे, केल्याप्रमाणे असेल ते खेरीज करून" हे शद्र दाखल करावे,<br>(२) परंतुकानंतर पुढील जादा परंतु दाखल करावे :-<br>" तसेच, या पोटकलमाची कंडिका (ग) हिच्या कारणाकरिता नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा नोकराला जी सहकारी संस्था कर्जाऊ रक्कम देते किंवा जिने अशी रक्कम दिली आहे किंवा जो त्यांच्याकडून पैसे कर्जाऊ घेते किंवा जीने असे पैसे कर्जाऊ घेतले आहेत अशा सहकारी संस्थाचे जो इसम संचालक किंवा सदस्य असेल त्याचा कर्ज देण्याच्या किंवा पैसे कर्जाऊ घेण्याच्या अशा कोणत्याही व्यवहारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भाग किंवा हितसंबंध आहे असे समजण्यात येता कामा नये. |

२. मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम १८ वा); मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास अनुकूल करून घेतल्याप्रमाणेचा व लागू केल्याप्रमाणेचा आणि मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू केल्याप्रमाणेचा तो अधिनियम.

कलम १२ मध्ये :—

(१) पोट-कलम (२) यांत कंडिका (क) हीत "ज्याचा" या शब्दापूर्वी "यांत यापुढे तरतूद केल्याप्रमाणे असेल ते खेरीजकरून" हे शब्द दाखल करावे ;

(२) पोट-कलम (३) मध्ये —

(अ) कंडिका (१) च्यापूर्वी "(अ)" हा कंस व अक्षर दाखल करावे ;

(ब) "कंडिका (ब) अन्वये अपात्र झाला आहे असे समजता कामा नये." या मजकुराऐवजी "कंडिका (ब) अन्वये,

(ब) नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा नोकराला जी सहकारी संस्था कर्जाऊ रक्कम देते किंवा जिने अशी रक्कम दिली आहे किंवा जिने असे पैसे कर्जाऊ घेतले आहेत अशा सहकारी संस्थेचा तो संचालक किंवा सदस्य आहे याच केवळ कारणावरून पोट-कलम (२), कंडिका (क) अन्वये,

अपात्र झाला आहे असे समजता कामा नये हा मजकूर दाखल करावा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२ ६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद ४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**